नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे | Year - 4rd | अंक - २१ | Issue - 21 | वार - सोमवार दि. १५ जून २०२६ | Blow- Monday Date 15 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# माळशिरसमध्ये पिकअप गाडी विहीरीत कोसळून ८ जणांचा दुर्दैवी मृत्यू; ६ जण गंभीर जखमी

## पंढरपूर तालुक्यातील रांजणी गावावर शोककळा; देवदर्शन करून गावाकडे परतत असताना घडली दुर्घटना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूरच्या माळशिरस येथे मोठी दुर्घटना घडली आहे. माळशिरस येथे पिकअप गाडी विहरीत कोसळली आहे. या अपघातात पिकअप गाडीतील ८ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ६ जणांना वाचवण्यात प्रशासन आणि स्थानिक नागरिकांना यश आलं आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी नाशिकमध्येदेखील अशीच एक घटना समोर आली होती. नाशिकची घटना ही रात्री घडली होती. पण माळशिरसची घटना ही भर दिवसा घडली आहे. या घटनेत ८ जणांचा बुडून मृत्यू झाला आहे. आतापर्यंत आठ जणांचे मृतदेह विहरीतून बाहेर काढण्यात आले आहेत. सर्व १४ जण सोलापूरच्या



रांजणीगावचे रहिवासी आहेत. ते देवदर्शनाला गेले होते, अशी माहिती समोर येत आहे.

संबंधित अपघाताची घटना ही माळशिरस तालुक्यातील म्हसवड-पंढरपूर मार्गावर तांदूळवाडी गावाज-वळ घडली आहे. रस्त्याच्या बाजूला असणाऱ्या शेतात विहीर आहे. ही विहीर रस्त्याच्या शेजारीच आहे. या विहिरीला फार मोठे कठडे नाहीत. तसेच ती काठोकाठ पाण्याने भरली आहे. याच विहिरीत भाविकांची पिकअप गाडी कोसळली आहे. हा अपघात नेमका कसा घडला? ते अद्याप समजू शकलेलं नाही. पण भर दिवसा ही अपघाताची घटना घडली आहे. संपूर्ण महाराष्ट्राला सुन्न करणारी ही घटना आहे. घटनेत तब्बल ८ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे.

म्हसवडमधील सिद्धनाथाच्या दर्शनासाठी रांजणीगावचे १४ जण पिकअपने गेले होते. दर्शन घेऊन गावाकडे परतत असताना अपघात होऊन ८ जणांचा दुर्दैवी अंत झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण पंचक्रोशित हळहळ व्यक्त होत आहे. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी मोठी गर्दी जमा झाली. स्थानिकांनी तातडीने मदत कार्याला सुरुवात केली. तसेच पोलीस आणि इतर सुरक्षा पथक घटनास्थळी दाखल झाले. विविध लोकप्रतिनिधी घटनास्थळाच्या दिशेला रवाना झाले आहेत. या घटनेमुळे सर्वजण सुन्न झाले आहेत.

खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. माळशीरस तालुक्यात अपघात झाला आहे. तिथे मोठ्या प्रमाणात जीवितहानी झालेली आहे. मी आता त्या ठिकाणी भेट द्यायला निघालो आहे.

त्या ठिकाणी शासकीय मदत जेवढ्या लवकर मिळवता येईल असे प्रयत्न आमचे राहतील, अशी प्रतिक्रिया धैर्यशील मोहिते पाटील यांनी दिली.

स्थानिक आमदार उत्तम जानकर यांनीदेखील या घटनेवर प्रतिक्रिया दिली. तांदूळवाडीपासून ४ किमी अंतरावर रस्त्याच्या बाजूला एक विहीर आहे. त्या विहिरीत ही घटना घडली आहे. ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे.

अपघातग्रस्त गाडीत चार लहान मुलं, चार महिला होत्या. त्यांचा अंत झाला आहे आणि दोन पुरुष वाचले आहेत, अशी माहिती मिळत आहे. मी घटनास्थळी पोहोचत आहे. घटनास्थळी पोहोचल्यानंतर आपल्याला माहिती देतो, अशी माहिती उत्तम जानकर यांनी दिली.

### माळशिरसच्या घटनेवर मुख्यमंत्र्यांकडून दु:ख व्यक्त

# मृतांच्या वारसांना ५ लाखांची मदत जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूरच्या माळशिरस तालुक्यातील तांदूळवाडी गावाजवळ रविवारी झालेल्या भीषण अपघातात पिकअप वाहन थेट विहिरीत कोसळल्याने ८ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर ७ जणांना सुरक्षित विहिरीतून बाहेर काढण्यात प्रशासन आणि स्थानिक नागरिकांना यश आलं आहे. मृत सर्वजण पंढरपूर तालुक्यातील रांजणी गावचे रहिवासी असून ही घटना परिसरात शोककळा पसरव-णारी ठरली आहे. या घटनेतील मृतकांच्या वारसांना ५ लाखांची मदत जाहीर झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्विट करत या घटनेवर दु:ख व्यक्त केलं. यावेळी त्यांनी मृतांच्या नातेवाईकांना ५ लाखांची आर्थिक मदत दिली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. प्राथमिक माहितीनुसार, रांजणी गावातील भाविकांचा समूह म्हसवड येथील सिद्धनाथ मंदिराच्या दर्शनासाठी गेला होता.




### फ्रान्समधील 'भारत इनोव्हहेट्स' सोहळ्यात पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन

# नाविन्यता भारताच्या डीएनएमध्येच

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाईस (फ्रान्स) : भारताच्या तरुणांची मानसिकता नाविन्यपूर्ण असून, ती संपूर्ण मानवतेचा विचार करते. भारत आज केवळ संकुचित व्यावसायिक हितसंबंधांसाठी काम न करता मानवतेच्या कल्याणासाठी आणि शाश्वत भविष्यासाठी जागतिक स्तरावर नवनवीन शोध लावत आहे. नाविन्यता (इनोव्हेशन) ही भारताच्या डीएनएमध्येच आहे, असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. फ्रान्समधील नीस येथे आयोजित 'भारत इनोव्हहेट्स' या भव्य व्यासपीठाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या सोहळ्याला फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांची विशेष उपस्थिती होती.




पंतप्रधान मोदींनी भारताच्या बदलत्या प्रतिमेवर प्रकाश टाकत सांगितले की, भारत हा जागतिक इनोव्हेशनमधील एक उगवती शक्ती म्हणून उदयास आला आहे. भारत आता तंत्रज्ञानाचा केवळ ग्राहक राहिला नसून, जगाला विविध क्षेत्रांत उपाय पुरवणारा देश बनत आहे. भारतात सध्या जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप इकोसिस्टम कार्यरत आहे. या प्रदर्शनात जरी १००-१२५ स्टार्टअप्स दिसत असले, तरी भारताकडे आज २ लाखांहून अधिक स्टार्टअप्सचा अथांग पूल सज्ज आहे, जो जागतिक अर्थव्यवस्थेला गती देत आहे. हजारो वर्षांपूर्वी भारताने वैद्यकशास्त्र, योग, गणित आणि विज्ञान या क्षेत्रांतील आपल्या अद्वितीय योगदानातून मानवतेच्या प्रगतीला आकार दिला होता, त्याच वारशाचा विस्तार आजचा तरुण करत आहे.पंतप्रधानांनी जगभरातील गुंतवणूकदार, नामांकित विद्यापीठे, संशोधन संस्था आणि अग्रगण्य उद्योजकांना भारतासोबत भागीदारी करण्याचे थेट आवाहन केले. भारत इनोव्हहेट्स' हे जगासाठी भारतासोबत जागतिक नवसंशोधनाचा पुढील अध्याय लिहिण्याचे एक सशक्त माध्यम आहे. भारतात या, आमच्यासोबत काम करा. 'डिझाइन इन इंडिया' आणि 'डेव्हलप इन इंडिया' च्या माध्यमातून संपूर्ण जगासाठी शाश्वत उपाय शोधा.

**भारत-फ्रान्स संबंधांचे पंचसूत्र**

दोन्ही देशांमधील मजबूत आणि धोरणात्मक संबंधांचे कौतुक करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, भारत आणि फ्रान्सचे नाते हे कनेक्शन (संपर्क), कन्व्हिक्शन (विश्वास), इनोव्हेशन (नाविन्यता), इन्स्पिरेशन (प्रेरणा) आणि सामायिक दृष्टीकोन या पंचसूत्रीवर आधारित आहे. जागतिक आव्हानांवर तोडगा काढण्यासाठी दोन्ही देशांनी नेहमीच एकत्र पावले टाकली असून, हा नवा उपक्रम त्याचाच एक भाग आहे. या प्रसंगी बोलताना फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी भारताचा इनोव्हेशनचा देश असा गौरव केला आणि भारताच्या 'मेक इन इंडिया' उपक्रमाला फ्रान्सचा पूर्ण पाठिंबा जाहीर केला.



## संपादकीय....

### गैरव्यवस्थापनाचा ठपका

देशात नीट आणि सीबीएसई परीक्षेत झालेला घोटाळा ताजा असतानाच आज बिहारमध्ये कॉन्स्टेबल भरती परीक्षेतही तुफानी राडा झाला. बिहारमध्ये कॉन्स्टेबल भरती परीक्षा होत आहे. परीक्षा सुरू होण्यापूर्वी पाटलीपुत्र रेल्वे स्टेशनवर विद्यार्थ्यांनी राडा केला. परीक्षा देण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांनी गैरव्यवस्थापनाचा आरोप केला. या घटनेप्रकरणी सहा जणांना अटक करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी अनेक गाड्या थांबवल्या आणि स्टेशनवरील दुकाने व परीक्षेसाठीच्या विशेष ट्रेनची तोडफोड केली, ज्यामुळे स्टेशनभर काचेचे तुकडे उडाले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना गोळीबार करावा लागला. घटनास्थळी पोहोचलेले पाटणाचे जिल्हाधिकाऱ्यांनी आवाहन करत म्हणाले, मध्यरात्रीच्या सुमारास काही लोक गोंधळ घालत असल्याची माहिती आम्हाला मिळाली. आम्ही त्यांना थांबून उमेदवारांना सहकार्य करण्याची विनंती केली. दोन विशेष गाड्या आधीच सुरू असतानाही, काही समाजकंटकांनी वारंवार आपत्कालीन साखळी ओढून विशेष गाड्यांची मागणी केली. आंदोलकांनी निघून जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनाही अडवले. त्यामुळे आम्हाला सौम्य बळाचा वापर करावा लागला. आता परिस्थिती पूर्णपणे सामान्य असून गाड्या रवाना झाल्या आहेत. परीक्षा देणाऱ्यांसाठी नियोजित गाड्या आधीच सुटल्या आहेत. पाटलीपुत्र जंक्शनवरील विद्यार्थी आंदोलनाबाबत बिहार काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष राजेश राम म्हणाले, उत्तर बिहारमधील सर्व विद्यार्थ्यांना दक्षिण बिहारमध्ये बोलावले जात आहे. दक्षिण बिहारमधील विद्यार्थ्यांना उत्तर बिहारमध्ये पाठवले जात आहे. लोकांना आणि विद्यार्थ्यांना त्रास देणे हीच सरकारची दूरदृष्टी आहे. गाड्या पकडण्यासाठी बक्सर स्टेशनवर उमेदवारांची मोठी गर्दी जमली. कॉन्स्टेबल भरती परीक्षा देण्यासाठी आलेले विद्यार्थी कोणत्याही मार्गाने ट्रेनमध्ये चढण्याचा प्रयत्न करत आहेत. परिस्थिती अशी आहे की, आरक्षण असलेले प्रवासीही ट्रेनमध्ये चढू शकत नाहीत. कॉन्स्टेबल भरती परीक्षेची पहिली शिफ्ट संपल्यानंतर पाटणा जंक्शनवर विद्यार्थ्यांची गर्दी वाढू लागली आहे.

# जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर घडवले यशाचे साम्राज्य : उद्योजक संजय फुलमाळी यांची प्रेरणादायी वाटचाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट तालुक्यातील वागदरी या ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेले संजय फुलमाळी हे आज आपल्या जिद्द, चिकाटी, मेहनत आणि दूरदृष्टीच्या बळावर यशस्वी उद्योजक म्हणून ओळखले जातात. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी मनात ध्येय आणि काम करण्याची तयारी असेल तर यश नक्की मिळते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे संजय फुलमाळी.




वागदरी येथे त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. शिक्षणाच्या प्रवासात अनेक अडचणी आल्या. सन २००३ मध्ये ते दहावी परीक्षेत अनुत्तीर्ण झाले. अनेक जण अपयशाने खचून जातात; मात्र संजय यांनी हार मानली नाही. जिद्दीने पुन्हा अभ्यास सुरू केला आणि २००७ मध्ये दहावीची परीक्षा उत्तीर्ण होत स्वतःवरील विश्वास अधिक दृढ केला.

घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने शिक्षणाबरोबरच काम करण्याशिवाय त्यांच्याकडे दुसरा पर्याय नव्हता. त्यांनी पुण्यातील खेड शिवापूर येथे बुक बाइंडिंग आणि प्रिंटिंग प्रेसमध्ये काम करण्यास सुरुवात केली. त्याच काळात वडिलांचे निधन झाले आणि कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली. आई आणि भावाचा सांभाळ करताना अनेक संकटांचा सामना करावा लागला. मात्र संघर्षाला घाबरण्याऐवजी त्यांनी त्याला संधी मानले.

सन २०१४ मध्ये स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा धाडसी निर्णय त्यांनी घेतला. व्यवसायाचा कोणताही मोठा अनुभव नसतानाही केवळ आत्मविश्वास, प्रामाणिकपणा आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी सन एंटरप्रायझेसची स्थापना केली. सुरुवातीला अवघ्या ६० हजार रुपयांचे कटिंग मशीन घेऊन व्यवसायाची सुरुवात झाली. ग्राहकांचा विश्वास, दर्जेदार सेवा आणि वेळेचे नियोजन यामुळे व्यवसाय झपाट्याने वाढत गेला. कामाचा विस्तार होत गेल्याने नवीन यंत्रसामग्री खरेदी करण्यात आली. आज त्यांच्या संस्थेत १० ते १२ अत्याधुनिक मशिनरी कार्यरत असून चार ते पाच कामगारांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

सन एंटरप्रायझेस आज प्रिंटिंग, बाइंडिंग आणि स्टेशनरी क्षेत्रातील एक विश्वासार्ह नाव बनले आहे. व्हिजिटिंग कार्ड, गिफ्ट बॉक्स, बॉक्स फाईल, नामजप पुस्तके, वह्या, धार्मिक साहित्य, स्वामी समर्थ महाराजांच्या पुस्तकांची छपाई, स्पायरल बाइंडिंग, हार्ड बाइंडिंग, थीसिस, प्रोजेक्ट, संशोधन प्रबंध, रेकॉर्ड बुक्स आदी विविध कामे येथे अत्यंत दर्जेदार पद्धतीने केली जातात.

सकाळ, लोकमत यांसारख्या नामांकित संस्थांची कामे करण्याचा त्यांना अनुभव लाभला आहे. पुणे, नाशिक, कोल्हापूर यांसारख्या शहरांमध्ये त्यांच्या कामाच्या गुणवत्तेची विशेष दखल घेतली जाते. बदलत्या काळानुसार आधुनिक डिझाईन, नाविन्यपूर्ण कल्पना आणि ग्राहकांच्या अपेक्षेनुसार उत्कृष्ट सेवा देत त्यांनी बाजारपेठेत स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे.

व्यवसायात यश मिळूनही संजय फुलमाळी यांचा स्वभाव अत्यंत नम्र, मनमिळावू आणि सर्वांना आपलेसे करणारा आहे. ग्राहकांशी जपलेले स्नेहसंबंध, प्रामाणिक व्यवहार आणि कामातील गुणवत्ता यामुळे त्यांचा मित्रपरिवार आणि ग्राहकवर्ग दिवसेंदिवस वाढत आहे.

आज अनेक तरुणांना नोकरीच्या मागे धावण्याऐवजी उद्योग-व्यवसायाकडे वळण्याची प्रेरणा संजय फुलमाळी यांच्या जीवनप्रवासातून मिळते. अपयशाला घाबरू नका, परिस्थितीवर मात करा आणि स्वतःवर विश्वास ठेवा, हा संदेश त्यांची यशोगाथा देत आहे.

सन एंटरप्रायझेस दर्जेदार बाइंडिंग, उत्कृष्ट प्रिंटिंग आणि विश्वासार्ह सेवांचे केंद्र

पत्ता : एस. नं. १४, सिंहगड कॉलेज रोड, समर्थ नगर, कॅनॉल रोड, हिंगणे, पुणे - ४११०५१.

संपर्क : ९६०४७५४७७७ ७९७२५२२८४५

यशाचा मार्ग हा कधीच सोपा नसतो. संघर्ष, परिश्रम आणि सातत्य यांच्या आधारावरच तो घडवावा लागतो. संजय फुलमाळी यांनी हे सिद्ध करून दाखवले आहे की, मोठे होण्यासाठी मोठी पार्श्वभूमी लागत नाही, तर मोठी स्वप्ने आणि त्यासाठी झटण्याची तयारी लागते.

ही यशोगाथा उद्योजक बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या प्रत्येक तरुणासाठी प्रेरणादायी ठरेल.

जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर घडवले यशाचे साम्राज्य : उद्योजक संजय फुलमाळी यांची प्रेरणादायी वाटचाल

- धोंडपा नंदे (संपादक गावगाथा मीडिया नेटवर्क ९८५०६१९७२४)

# सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांची अवैध दारू विक्रेत्यावर कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दिनांक १३/०६/२०२६ रोजी १६:०० वा. च्या सुमारास मा. श्री प्रशांत डगळे सो, सहाय्यक पोलीस अधीक्षक (भा.पो.से.), पंढरपूर उपविभाग, पंढरपूर यांना पंढरपूर तालुक्यातील लक्ष्मी टाकळी गावातील हॉटेल शाही दरबारच्या बाजुला एका पत्राशेडच्या बाजुला एक इसम अवैधपणे देशीविदेशी दारूची विक्री करत असल्याची गोपनीय बातमी मिळाल्याने त्यांच्या कार्यालयाकडील पोलीस पथकासह श्रीराम नगरकडे जाणारे कच्च्या रोडवरील पत्राशेडचे बाजुला एक इसम पांढरे रंगाची पिशवी घेवून थांबलेला दिसला, पोलीस पथकास त्याचा संशय आल्याने त्यास गराडा घालून जागीच पकडले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारता, त्याने त्याचे नाव शरद बाळासाहेब रणदिवे रा. कांतीवीर लहुजी वस्तादनगर, टाकळी रोड, पंढरपूर असे असल्याचे सांगितले. त्याचे जवळील पिशवी तपासून पाहता त्यामध्ये देशी विदेशी दारूच्या बाटल्या असा एकुण १६०३०/- रू. किंमतीचा मुद्देमाल अवैधरित्या विक्री करत असताना मिळून आलेने पोहेकॉ/१७३१ ताजुद्दीन मुजावर यांनी पंढरपूर तालुका पोलीस ठाणेस महा. प्रोव्ही. अधि. कलम ६५ (ई) प्रमाणे फिर्याद दिली आहे.



मा. श्री प्रशांत डगळे सो, सहाय्यक पोलीस अधीक्षक (भा.पो.से.), पंढरपूर उपविभाग, पंढरपूर यांनी पंढरपूर शहर व तालुक्यातील जनतेला आवाहन केले आहे की, आपल्या गावामध्ये अशा प्रकारचे अवैध धंदे चालु असल्यास आम्हास संपर्क करावा व यापुढे कोणी अशा प्रकारचे बेकादेशीर कृत्य अथवा अवैध धंदे सुरू ठेवील अशा समाजविघातक लोकांवर प्रचलित कायदयानुसार अत्यंत कडक कारवाई केली जाईल. तसेच अशा लोकांची यापुढे गय केली जाणार नाही असे सांगितले आहे.

सदरची कारवाई मा. श्री प्रशांत डगळे सो, सहाय्यक पोलीस अधीक्षक (भा.पो.से.), पंढरपूर उपविभाग, पंढरपूर यांचे मार्गदर्शनाखाली पोहेकॉ/१७३१ मुजावर, पोना/१५२७ गायकवाड, पोकॉ/१४२३ लोंढे, पोकॉ/२११० हुलजंती यांनी पार पाडलेली आहे.

# नारायण चिंचोली ग्रामपंचायतच्या सन्मानात आणखी एक मानाचा तुरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली गावच्या सरपंच सौ नर्मदा ताई लक्ष्मण धनवडे यांना लोकमत परिवारावर तर्फे दिला जाणारा महाराष्ट्राचे महा सरपंच हा अवार्ड देऊन सन्मानित करण्यात आले. यशदाचे उपसंचालक माननीय श्री मल्लिनाथ कल शेट्टी साहेब व जिल्हा परिषद सोलापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री कुशल जैन साहेब (खड) यांच्या शुभहस्ते या पारितोषकाचे वितरण करण्यात आले.

यावेळी नारायण चिंचोली गावाने केलेल्या नाविन्यपूर्ण विकास कामांचा उल्लेख मान्यवरांनी केला.




नारायण चिंचोली हे तालुक्यातील आदर्श गाव असून मागील पाच वर्षात माझं गाव आरोग्य संपन्न गाव या थीम अंतर्गत आरोग्य केंद्राचे सुशोभीकरण, गरोदर मातांना पूरक आहार, मायेचे ओटीभरण, नवजात बालकांसाठी बेबी किट, नियमित लसीकरण, आरोग्य तपासणी शिबिर, मोफत औषधोपचार, प्रसूतीगृह, आयुष्यमान कार्ड शिबिर,दिव्यांगाना लाभांश, स्वच्छता व साफसफाई, सांडपाणी व घनकचऱ्याचे व्यवस्थापन, हुंडाबळी,बालविवाह व जाती निर्मूलन यासारख्या संवेदनशील विषयावर कलापथकाच्या माध्यमातून समाज प्रबोधन यासारखे अनेक चांगले उपक्रम राबवून नारायण चिंचोली गावाने आदर्श निर्माण केला आहे. हा पुरस्कार संपूर्ण गावाचा असून गावातील प्रत्येक नागरिकांनी एकत्र येऊन सुसंस्कारित गाव निर्माण करण्यासाठी टाकलेले पाऊल आहे. असे मत पुरस्कार विजेत्या सरपंच नर्मदाताई धनवडे यांनी व्यक्त केले. यावेळी पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे संचालक लक्ष्मण तात्या धनवडे, उपसरपंच गहिनीनाथ तात्या चव्हाण, मा. सरपंच लक्ष्मण तात्या कोले , मा. सरपंच बळवंत धनवडे, मा.सरपंच विठ्ठल माने, आप्पा वाघमोडे, दत्तात्रय बनसोडे, ग्रामपंचायत अधिकारी संतोष गायकवाड, सी एच ओ स्वप्नाली शिंदे मॅडम, ज्ञानेश्वर वाघमोडे यांच्यासह जिल्ह्यातून आलेले पदाधिकारी हजर होते.

# ओमानच्या किनाऱ्याजवळ 'विराट-१' जहाज बुडाले, अमेरिकी नौदलाकडून १४ भारतीय खलाशांची सुटका

नवी दिल्ली : आखाती प्रदेशात वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, आणखी एक मोठा सागरी अपघात घडला आहे. भारतीय जहाज 'एमएसव्ही विराट-१' ओमानच्या किनाऱ्याजवळ बुडाले. जहाजावर चौदा भारतीय नागरिक होते. अमेरिकी नौदलाच्या मदतीने सर्व भारतीयांना सुखरूप वाचवण्यात आले. जहाज बुडण्याचे कारण अद्याप अज्ञात आहे. ओमानमधील भारतीय दूतावासाने रविवारी सांगितले की, त्यांना ओमानच्या किनाऱ्याजवळ १४ भारतीयांना घेऊन जाणाऱ्या जहाजाच्या अपघाताची माहिती मिळाली आहे. दूतावासाने सांगितले की, भारतीयांना सुखरूप वाचवण्यात आले असून बचावकार्य अजूनही सुरू आहे. दूतावासाने सांगितले की, जहाजाचे इंजिन निकामी झाले होते. दूतावासाने पुढे सांगितले की, भारतीय कर्मचाऱ्यांना लाईफ राफ्टमध्ये सुरक्षितपणे हलवण्यात आले.अमेरिकी नौदलाकडून मिळालेल्या माहितीनुसार, १४ भारतीयांना घेऊन जाणारे एमएसव्ही विराट-१ हे जहाज रास अल हद्दपासून अंदाजे ८० नॉटिकल मैल अंतरावर बुडत होते. बुडणाऱ्या जहाजाकडे भारतीय नौदलाची जहाजे पाठवण्यात आली. अमेरिकी नौदलाच्या पी८ विमानाने एक लाईफ राफ्ट खाली टाकला. एमव्ही जबल अली ९ नावाचे दुसरे जहाजही बुडणाऱ्या जहाजाच्या दिशेने जात होते. एमव्ही जबल अलीकडून मिळालेल्या माहितीनुसार, सर्व १४ भारतीय लाईफ राफ्टमध्ये चढले होते. भारतीय दूतावासाने सांगितले की, सर्व भारतीय सुरक्षित आहेत, पण ओमानच्या अधिकाऱ्यांच्या समन्वयाने जवळच्या जहाजांच्या मदतीने बचावकार्य सुरू आहे.

# ॲडव्होकसी बैठकीतून उमटला निर्धार; ऊसतोड महिला कामगारांच्या कल्याणासाठी 'दृढ संकल्प




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : ऊसतोड महिला कामगारांचे केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बीड जिल्ह्यातील माजलगाव येथे कार्यरत असलेल्या ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्य व कल्याणासाठी विविध यंत्रणांमध्ये समन्वय निर्माण करण्याच्या उद्देशाने एकदिवसीय ॲडव्होकसी बैठकीचे आयोजन करण्यात आले. फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा संचलित आणि बोनसुक्रो अनुदानित 'ग्रो प्रकल्पा'अंतर्गत आयोजित या बैठकीत शासकीय व खाजगी वैद्यकीय अधिकारी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी तसेच एन.एस.एल. साखर कारखान्याचे प्रशासकीय अधिकारी सहभागी झाले होते.

यावेळी उपस्थितांनी ऊसतोड महिला कामगारांना अद्ययावत आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण सुविधा आणि विविध शासकीय योजनांचा लाभ खऱ्या गरजूंना मिळवून देण्यासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा दृढ संकल्प व्यक्त केला

एन.एस.एल. साखर कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक के. व्ही. व्ही. एस.एन. मूर्ती यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून बैठकीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, मानव संसाधन विभागाचे वरिष्ठ अधिकारी देवाप्पा जोगरे, जी.एम. केनचे डव्होकसी विभाग प्रमुख पारसनाथ जयस्वाल, सुप्रसिद्ध स्त्रीरोग व प्रसूतीतज्ज्ञ डॉ. सावित्री घाटोळ, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, फिल्ड को-ऑर्डिनेटर शहाबुद्दीन शेख आणि कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी उपस्थित होते.

'ग्रो प्रकल्पा'ची माहिती देताना डॉ. येळेगावकर म्हणाले की, एन.एस.एल. साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊसतोड महिला कामगारांसाठी प्रजनन आरोग्य, कुटुंब कल्याण सेवा, गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रियांची कारणमीमांसा व प्रतिबंधात्मक उपाय, मासिक पाळी स्वच्छता आणि सॅनिटरी नॅपकिनच्या वापराविषयी जनजागृती केली जात आहे. तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ पात्र महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रकल्प प्रभावीपणे कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.

उद्घाटनपर भाषणात के. व्ही. व्ही. एस.एन. मूर्ती यांनी 'ग्रो प्रकल्पा'च्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, ऊसतोड महिला कामगारांपर्यंत प्रजनन आरोग्यविषयक सेवा घरपोच पोहोचविणे, अनावश्यक गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रियांपासून त्यांना परावृत्त करणे आणि प्रभावी समुपदेशन करणे हे अत्यंत महत्त्वाचे कार्य प्रकल्पामार्फत होत आहे. या उपक्रमाच्या भविष्यातील वाटचालीसाठी एन.एस.एल. साखर कारखान्याकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

बैठकीदरम्यान उपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांनीही मनोगत व्यक्त केले.*

माजलगाव तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि खाजगी रुग्णालयांमार्फत ऊसतोड महिला कामगारांना दर्जेदार व मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच त्यांच्यापर्यंत विविध कल्याणकारी योजना पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. या बैठकीस २५ वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तर १५ एन. एस. एल. साखर कारखान्याच्या विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी सहभाग नोंदविला होता.

बैठकीच्या यशस्वी आयोजनासाठी एफ. पी. ए. आय. मुख्यालयाच्या डायरेक्टर जनरल डॉ. कल्पना आपटे, डिशनल डायरेक्टर जनरल प्रोग्राम अमिता धानू, डायरेक्टर ग्रो प्रोजेक्ट डॉ. निलेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले तर शहाबुद्दीन शेख, दिलीप पाटील, किस्किंदा चवरे आणि आकाश गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे स्वागत शहाबुद्दीन शेख यांनी केले, तर प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले आणि आभार प्रदर्शन प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी मानले.

फोटो ओळ : *बोनसुक्रो अनुदानित 'ग्रो प्रकल्पा'तर्फे आयोजित डव्होकसी बैठकीचे दीप प्रज्वलन करून उद्घाटन करताना एस.एन. मूर्ती, डॉ. श्रीकांत येळेगावकर, डॉ. एन. बी. तेली, देवाप्पा जोगरे, पारसनाथ जयस्वाल, डॉ. सावित्री घाटोळ, सुगतरत्न गायकवाड,शहाबुद्दीन शेख, वीरेंद्र परदेशी, दिलीप पाटील, किस्किंदा चवरे आदी दिसत आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# तब्बल ३० वर्षापासून दादाजी भरतोय लोककलेवर पोट...!

## अजुनही कलावंत मानधन नाही ; ३०-३५ वर्षापासून अविरत सेवा





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी बाराभाटी :

कला साहित्य सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात उभ्या महाराष्ट्रासह ग्रामीण भागही समृद्ध आहे. ग्रामीण भागातील कलाकार हे आज रुपेरी पडद्यावर पोहाेचले आहे. त्यातील एक ग्रामीण भागातील कलावंत म्हणजे बाराभाटी येथील दादाजी रुका मेश्राम आहेत. ते गेल्या ३०-३५ वर्षापासून लोककलेवर आपले पोट भरत आहेत. तरी अजूनही त्यांना वृद्ध कलावंत मानधन मिळालेला नाही. ही मोठी खंत आहे.

कलाकार हा कोणताही असा तो कलेवर आपले उदरनिर्वाह करत असतो. दादाजी मेश्राम हे दोघे पती पत्नी असून त्यांना अपत्य नाही. दादाजी हे आपल्या कलेच्या जोरावर कसे बसे रोजी रोटी कमवून जीवन जगतात. दादाजी हे लहानपणापासून कलेवर प्रेम करतात. कला हा त्याच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेला आहे.

दादाजी मेश्राम यांनी महाराष्ट्र नाही तर महाराष्ट्र बाहेर गुजरात, उदयपूर, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश या राज्यात त्यांनी दंडार या लोककला कार्यक्रमात ढोलक वाजविले. तसेच कलावंत म्हणून काम केले. तसेच नागपूर चंद्रपूर आकाशवाणी, मुंबई वरळी, उदयपूर येथील दुरदर्शन वाहिनीवर थेट प्रक्षेपणात ढोलक वाजविले आहे. त्याबद्दल त्यांना अनेक ठिकाणी सन्मान मिळाला व प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. कोरोना काळातही दादाजी मेश्राम यांच्यावर उपासमारीची वेळ आली होती.

> माझी ६५ झाली पण कोणताही मानधन मिळाला नाही. बराच भारत फिरलो पण आर्थिक लाभाचा आधार नाही. मानधन देण्यात यावे.
>
> **– दादाजी रुका मेश्राम**
> **दंडार कलावंत, बाराभाटी**

कारण कार्यक्रम सर्वत्र बंद करण्यात आले होते. अशावेळी हिमंत न हारता मजुरी करून पोटाची खळगी भरत गेले. तसेच कार्यक्रम नसले की ते भागवत सप्ताह ह्या कार्यक्रमात ते आठवडाभर कलाकरांची रंगरंगोटी करून देतात. वेशभूषा करून कलाकारांना तयार करतात.

दादाजी मेश्राम हे ६५ वर्षांचे असूनही त्यांना शासकीय किंवा निमशासकीय कोणताच आधार नाही. कुठलाही लाभ मिळत नाही. अशा कलाकारांना मानधन मिळाला पाहिजे. जेणेकरून त्यांचे आणि पत्नीचे पोट भरले पाहिजे.

# डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलचा गुणवत्ता पूर्ण शिक्षणामुळे शैक्षणिक दर्जा वाढला




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

### जनतेचा विश्वास व ज्ञानाचे प्रभावी व्यासपीठ म्हणून उदयास आलेली शाळा

नळदुर्ग /दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग शहरात प्रथमच सुरू झालेल्या डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूलने अल्पावधीतच गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या बळावर विद्यार्थ्यांसह पालकांचा विश्वास संपादन केला आहे. नर्सरी, एलकेजी, युकेजी ते दहावीपर्यंतचे वर्ग असलेल्या या शाळेने उत्कृष्ट अध्यापन पद्धती आणि शैक्षणिक दर्जामुळे परिसरात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

ज्ञानाचे प्रभावी व्यासपीठ म्हणून उदयास आलेली ही संस्था विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. दर्जेदार शिक्षण, अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थीकेंद्रित अध्यापन यामुळे शाळेची प्रगती दिवसेंदिवस वाढत आहे.

शाळेचे मुख्य प्रवर्तक, संस्थापक तथा नळदुर्ग नगरपरिषदेचे विद्यमान नगरसेवक व गटनेते मारुती खारवे यांच्या मार्गदर्शना मुळे शाळेची वाटचाल ही उत्कृष्टपणे होत आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण देखरेखीमुळे आणि शैक्षणिक गुणवत्तेवरील भरामुळे डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मीडियम स्कूल आज नळदुर्ग शहरासह परिसरातील पालकांची पहिली पसंती ठरली आहे.

विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणे आणि उच्च दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देण्यामध्ये शाळेने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे, दहावी बोर्ड परीक्षेत सलग सहा वर्षे केंद्रात प्रथम क्रमांक मिळवून शाळेने शैक्षणिक क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला आहे.

याच गुणवत्तेमुळे नव्या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश घेण्यासाठी पालकांची मोठी गर्दी होत असून, शाळेबाबत नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. भविष्यातही विद्यार्थ्यांना आधुनिक, दर्जेदार आणि मूल्याधिष्ठित शिक्षण देण्याचा मानस शाळा व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे.

# राष्ट्रीय कार्यदर्पण सन्मान पुरस्काराने मोहन कदम यांचा गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे मोहन कदम यांना महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्था,नवीन पनवेल यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय कार्यदर्पण गौरव संमेलनामध्ये राष्ट्रीय कार्यदर्पण सन्मान पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.समाजहितासाठी सातत्याने कार्य करत असलेल्या मोहन कदम यांनी पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाची दखल घेत हा सन्मान देण्यात आला.त्यांच्या



कार्यामुळे समाजात जनजागृती निर्माण होण्यास तसेच विविध सामाजिक उपक्रमांना चालना मिळण्यास मदत झाली आहे.संस्थेच्या वतीने देण्यात आलेल्या सन्मानपत्रात त्यांच्या कार्याचे कौतुक करण्यात आले असून,भविष्यातही समाजसेवेच्या माध्यमातून त्यांनी अधिक उंची गाठावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.या सन्मानामुळे त्यांच्या कार्याला नवी प्रेरणा मिळाली असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.हा पुरस्कार मिळाल्याबद्दल मोहन कदम यांनी संस्थेचे आभार मानत समाजहिताचे कार्य अधिक जोमाने सुरू ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला.

# श्री बी.पी. रोंगे यांची शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीची मोर्चेबांधणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर, पुणे विभागीय विधान परिषद शिक्षक मतदार संघातून भाजपकडून विठ्ठल अभियांत्रिकी महाविद्यालयाची संस्थापक प्राध्यापक बीपी रोंगे निवडणूक लढवण्यास इच्छुक असून त्यांनी इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या सत्काराच्या माध्यमातून निवडणुकीची मोर्चे बांधणी सुरू केली असल्याचे दिसून येत आहे.

पुणे विभागीय शिक्षक मतदार संघातून पुणे सांगली सातारा कोल्हापूर सोलापूर या पाच जिल्ह्यांचा समावेश होतो काही दिवसापूर्वी इयत्ता दहावी बारावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे यामध्ये अनेक विद्यार्थ्यांनी चांगली गुण प्राप्त केले असून त्यामुळे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्राध्यापक बीपी रोंगे यांनी या जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याचा जाऊन येता दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात सुरुवात केली आहे या माध्यमातून त्यांनी निवडणुकीची मोर्चा बांधणी सुरू केली असल्याचे दिसून येत आहे.



काही दिवसांपूर्वी रोंगे यांनी मतदान नांनी केले होते या शिक्षकाकडून चांगला प्रतिसाद मिळत होता आता आरोग्य यांनी मोर्चे बांधणी सुरू केले असल्याने दिसून येत आहे पुणे विभागातील शिक्षक मतदार संघात पन्नास हजार मतदारा असून अठ्ठावीस तालुक्यातून यामध्ये सर्वाधिक मतदान ३२ हजार पुणे विभाग साताारा जिल्ह्यात दोन हजार कोल्हापूर जिल्ह्यात ५००० सांगली जिल्ह्यात ४९१ सोलापूर जिल्ह्यात ९००० मतदार आहेत सध्या स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीचे रणधुमाळी सुरू असताना तरंगे यांनी पुणे विभागीय विधान परिषद शिक्षक मतदार संघाची मोर्चेबांनी सुरू केली आहे रोंगे यांना शिक्षकाकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.

# स्वेरीत नेत्रदान जनजागृती व नेत्र तपासणी शिबिर उत्साहात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर कडून प्राप्त निर्देशानुसार राष्ट्रीय सेवा योजना विभाग, स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर आणि लायन्स क्लब पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वेरीमध्ये नेत्रदान दिनाचे औचित्य साधून नुकतेच 'नेत्रदान जनजागृती' व 'नेत्रतपासणी शिबिर' घेण्यात आले. या उपक्रमाला प्रचंड प्रतिसाद मिळाला.

हा कार्यक्रम गोपाळपूर (ता. पंढरपूर) मधील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या ओल्ड टीपीओ हॉलमध्ये उत्साहात पार पडला. स्वेरीचे संस्थापक व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार व विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती यांच्या नेतृत्वाखाली या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. दीपप्रज्वलनानंतर महाराष्ट्र गीत व राष्ट्रीय सेवा योजननेच्या गीताने कार्यक्रमाला सुरवात झाली. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे यांनी स्वेरीच्या वतीने पाहुण्यांचे स्वागत केले.

प्रास्ताविकात पंढरपूर विभागीय राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. संजय मुजमुले यांनी कार्यक्रमाची रूपरेषा व उद्दिष्टे स्पष्ट केली तर स्वेरीच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांनी नेत्रदानाचे महत्त्व, त्याची सामाजिक गरज आणि मानवतेसाठी असलेले योगदान याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी गौरी नेत्रालयचे नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. किरण बहिरवाडे, भंडीशेगावचे सरपंच, उद्योजक व समाजसेवक गणेश पाटील तसेच सुहासिनी दुग्धालयचे शशिकांत कराळे यांनी विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांना नेत्रदानाचे महत्त्व पटवून देत समाजात जनजागृती करण्याचे आवाहन केले. एका नेत्रदात्यामुळे दोन अंध व्यक्तींना दृष्टी मिळू शकते, असे सांगून त्यांनी नेत्रदानाचा संकल्प करण्यासाठी उपस्थितांना प्रेररीत केले. या कार्यक्रमास स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पंढरपूर, स्वेरीज कॉलेज ऑफ फार्मसी पंढरपूर, स्वेरीज पॉलिटेक्निक पंढरपूर, आयसीएमएस कॉलेज कासेगाव, उमा महाविद्यालय पंढरपूर, श्रीकृष्ण महाविद्यालय चळे, दलित मित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय मंगळवेढा, यशवंत भाऊ पाटील महाविद्यालय भोसे (ता. पंढरपूर), न्यू सातारा. बीसीए महाविद्यालय, कोर्टी तसेच पंढरपूर विभागातील विविध शाळा व महाविद्यालयांतील जवळपास १५३ राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग नोंदविला. विशेष म्हणजे, कार्यक्रमाच्या सकारात्मक परिणामस्वरूप २१ स्वयंसेवकांनी व शिक्षकांनी नेत्रदान प्रतिज्ञापत्र भरून नेत्रदानाचा संकल्प केला तसेच शिबिरामध्ये सहभागी विद्यार्थी, शिक्षक व कर्मचाऱ्यांची प्राथमिक नेत्रतपासणी करण्यात आली व त्यांना आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवर, डॉक्टर, लायन्स क्लबचे पदाधिकारी, शिक्षक, कर्मचारी व स्वयंसेवक यांचे आभार मानण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दलित मित्र गुरुजी महाविद्यालय, मंगळवेढा येथील प्रा. पल्लवी भोजने यांनी केले आणि सर्वांचे आभार मानले.

## स्टँडर्ड चार्टर्ड बँकेच्या सामाजिक उपक्रमांचा महाराष्ट्रातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना लाभ

# राज्याच्या विकासात बँकेचे योगदान महत्त्वपूर्ण : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने गेल्या सात वर्षांत महाराष्ट्रात जलसुरक्षा, आरोग्यसेवा, रोजगारनिर्मिती आणि हवामान बदलाला तोंड देण्याच्या क्षमतेच्या विकासासाठी राबविलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा राज्यातील ८.३ लाखांहून अधिक नागरिकांना थेट लाभ झाला आहे. या उपक्रमांमुळे राज्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्य शासन आणि खासगी क्षेत्र यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे विकासाचे फायदे समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचत आहेत. जलसंवर्धन, ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण आणि आरोग्यसेवा या क्षेत्रांत स्टँडर्ड चार्टर्ड बँकेने केलेले कार्य राज्याच्या विकास उद्दिष्टांना पूरक ठरत आहे. बँकेच्या विविध सामाजिक उपक्रमांच्या लाभार्थ्यांमध्ये महिलांचे प्रमाण ५२ टक्क्यांहून अधिक असून, जलसंधारण, आरोग्यसेवा आणि उपजीविका वृद्धी या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला आहे. महाराष्ट्रातील ३० जिल्ह्यांमध्ये; तसेच राज्यातील ७५ टक्के आकांक्षी जिल्ह्यांमध्ये हे उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले आहेत.



**जलसुरक्षेसाठी व्यापक उपाययोजना**

जलसुरक्षा उपक्रमांतर्गत १.०६ अब्ज लीटर गोड्या पाण्याची साठवण क्षमता निर्माण करण्यात आली असून, दुष्काळग्रस्त भागांमध्ये ४५ वॉटर एटीएमची स्थापना करण्यात आली आहे. मराठवाडा आणि विदर्भातील गावांसह राज्यातील २७१ गावांमध्ये जलसुरक्षा मजबूत करण्यात आली आहे; तसेच ८ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना जलसंवर्धन उपाययोजना आणि हवामान-सुसंगत शेती तंत्रज्ञानासाठी मदत करण्यात आली आहे. हवामान बदलाचे परिणाम कमी करण्याच्या दिशेने ७ लाख वृक्षांची लागवड हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.

**रोजगार आणि कौशल्य विकासाला चालना**

रोजगारक्षमतेच्या क्षेत्रात ६ हजार ५९८ युवकांना कौशल्य विकास आणि रोजगार प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यापैकी ६३ टक्के युवकांना रोजगार मिळाला आहे. इलेक्ट्रिक वाहने, वाहन उद्योग, कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रॉनिक्स, बँकिंग आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. लाभार्थ्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न १.६६ लाख रुपये इतके नोंदविण्यात आले आहे. या कार्यक्रमातील ६१ टक्के लाभार्थी महिला असून, ग्रामीण भागातील महिला उद्योजिकांना विशेष आर्थिक सहाय्य पुरविण्यात आले आहे. याशिवाय ७५८ महिला सूक्ष्म उद्योजिकांनाही मदत करण्यात आली आहे.

**आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी**

आरोग्य क्षेत्रात बँकेच्या सीईंग इज बिलिव्हिंग' या प्रमुख उपक्रमांतर्गत ४ लाख ३९ हजार ६८८ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली, तर ३८ हजार ६२५ नेत्रशस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडण्यात आल्या. राज्यभरात ४९ दृष्टी केंद्रांची स्थापना करण्यात आली असून, ही केंद्रे आता स्वयंपूर्ण पद्धतीने कार्यरत आहेत. या केंद्रांमधून दरवर्षी सुमारे १.६ कोटी रुपयांचे उत्पन्न निर्माण होत आहे. जिल्हा अंधत्व नियंत्रण संस्था आणि आयुष्मान भारत यांसारख्या शासकीय योजनांशी समन्वय साधून या उपक्रमांचा विस्तार करण्यात आला आहे.

स्टँडर्ड चार्टर्ड बँक, भारतच्या शाश्वतता विभागाच्या प्रमुख करुणा भाटिया यांनी सांगितले की, वंचित आणि दुर्लक्षित समुदायांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी बँक कटिबद्ध असून, महाराष्ट्रातील जलसुरक्षा, आरोग्य आणि रोजगार क्षेत्रातील उपक्रम ही दीर्घकालीन सामाजिक बांधिलकीची प्रभावी उदाहरणे आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले की, राज्यातील लाखो नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणारे हे उपक्रम शाश्वत विकास, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक समावेशनाला गती देणारे ठरत आहेत.

# पवारांच्या लढ्याला यश मिळावे यासाठी चंद्रभागेची महाआरती

## अन्नदात्यासाठीच्या आ. रोहित पवार यांच्या आंदोलनाला महर्षी वाल्मिकी संघाचा पाठींबा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर (प्रतिनिधी) : पंढरपुरातील शिवतिर्थावर आमदार रोहित पवार यांच्या शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी मिळावी यासाठी सुरु असलेल्या अन्नत्याग आंदोलनाला महर्षी वाल्मिकी संघाच्या वतीने पाठींबा दर्शविला आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव व कार्यकर्त्यांनी नुकतीच आंदोलनस्थळी आमदार रोहित पवार यांची भेट घेऊन आपला पाठींबा जाहीर केला.

महर्षी वाल्मिकी संघाचे वतीने पंढरपुरात चंद्रभागेच्या पात्रामध्ये चंद्रभागेची आरती करण्यात आली. महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांना सद्बुद्धी घालावी आणि आमदार रोहित पवार यांच्या आंदोलनाला यश यावं. यासाठी ही आरती करण्यात आली.

आमदार रोहित पवार पंढरपूर येथे करत असलेल्या अन्नत्याग आंदोलनाला एक शेतकरी पुत्र व सामाजिक कार्यकर्ता व एक संवेदनशील पंढरपूरकर म्हणुन माझा व आमच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांचा पुर्ण पाठिंबा आहे. रोहित पवार यांच्या मागण्या योग्य आहेत. त्यांनी सरकाचा शेतकरी कर्जमाफीचा जुमला पुर्णपणे उघडा पाडला आहे. सरकार देत असलेली कर्जमाफी ही धुळफेक आहे. जाचक नियम आणि अटीमुळे खुप कमी शेतकरी कर्जमुक्त होतील हे रोहित पवारांच म्हणणं खर आहे हे कर्जमाफीचा ऋ्ठ वाचला तर सहज लक्षात येईल, सरकार शेतकऱ्यांची कशी थट्टा करत आहे. असे मत यावेळी गणेश अंकुशराव यांनी व्यक्त केले.



यावेळी यावेळी महर्षी वाल्मिकी संघ संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव आणि बापू शिंदे यांच्यासह अनेक समाज बांधव उपस्थित होते.

आंदोलनकर्ते आमदार रोहित पवार यांच्या प्रमुख मागण्या :

२०१९ च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना केवळ ५० हजारांपर्यंतच्या कर्जमाफीच्या मर्यादेची अट रद्द करून सर्व शेतकऱ्यांना सरसकट

**सरसकट शेतकरी कर्जमाफीसाठीची सद्बुद्धी सरकारला येवू दे ! – गणेश अंकुशराव**

२ लाखांपर्यंत कर्जमाफी द्यावी.

एकवेळ समझोत्यामध्ये (जढड) २०१९ च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना ५० हजारांपर्यंतच्या कर्जमाफीच्या मर्यादेची अट रद्द करून सर्व शेतकऱ्यांना सरसकट २ लाखांपर्यंत कर्जमाफी द्यावी.

२ लाखांहून अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना २ लाखांवरील रक्कम आधी भरण्याची अट न ठेवता सरकारने सरसकट दोन लाखांपर्यंतची कर्जमाफी करावी.

प्रोत्साहनपर अनुदान देताना सलग दोन वर्षे नियमित कर्ज भरण्याची अट रद्द करावी.

२०१७ च्या कर्जमाफीसाठी पात्र असूनही केवळ कागदपत्रांअभावी २०१७ कर्जमाफीचा लाभ रखडलेल्या ६.५६ लाख शेतकऱ्यांना तात्काळ कर्जमाफी देण्यात यावी.

पीकविमा योजनेतील शेतकरी विरोधी जाचक ट्रिगर काढून १ रुपयामध्ये पीकविमा योजना पुन्हा लागू करावी.

पेरणीपूर्व कर्ज खात्यांचे पुनर्गठन करून शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम टाकावी, जी त्यांना पेरणीसाठी उपयोगी पडेल.

पवार यांच्या या सर्व मागण्या वस्तुनिष्ठ आहेत. यामुळं शेतकऱ्यांनी जाग झालं पाहिजे.

आता कर्जमाफीच्या ऋ्ठ मधील नियम व अटी पाहिल्या तर एक टक्का शेतकऱ्यांना ही कर्जमाफीचा फायदा होणं अवघड आहे.

शिक्षित आणि स्वतःच्या डोक्यांनी चालणाऱ्या शेतकऱ्यांच्या पोरांनी सरकारची फसवेगिरी उघड पाडली पाहिजे आणि आंदोलनाला समर्थन दिल पाहिजे. असंही यावेळी गणेश अंकुशराव म्हणाले.

# 'शिक्कामोर्तब' नाटकाच्या माध्यमातून लोकप्रिय अभिनेते 'कांचन पगारे' मजनू या 'बंगाली' भूमिकेतून उडवणार हास्याचे फवारे!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई (केतन भोज) ;हिंदी आणि मराठी मनोरंजन विश्वात, तसेच छोट्या पडद्यापासून ते मोठ्या पडद्यापर्यंत आपल्या सहजसुंदर अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण करणारे अष्टपैलू अभिनेते कांचन पगारे आता एका नव्या दमाने रंगभूमीवर परतले आहेत. 'तरंगिणी एंटरटेनमेंट' आणि 'नवनीत' निर्मित, तसेच प्रमोद शेलार लिखित व दिग्दर्शित 'शिक्कामोर्तब' या नव्याकोऱ्या नाटकातून ते रसिक प्रेक्षकांना आपल्या प्रतिभेची एक वेगळीच जादू दाखवण्यासाठी सज्ज झाले आहेत. नाटक ही कलाकाराच्या अभिनय क्षमतेची खरी कसोटी मानली जाते. प्रसिद्धीपेक्षा कलेवरील




अभिनयातील 'केमिस्ट्री' आणि जुगलबंदी संपूर्ण नाटकात भाव खाऊन जाते. त्यांना स्नेहा पराडकर यांच्या करारी 'वकिली'ची आणि भक्ती रत्नपारखी यांच्या 'लैला' या पात्राची उत्तम साथ लाभली आहे. एका जोडप्याच्या आयुष्यात अचानक आलेल्या दुसऱ्या जोडप्यामुळे निर्माण होणारा गोंधळ आणि त्यातून नात्यांवर अधिकृतरीत्या 'शिक्कामोर्तब' करणे किती गरजेचे असते, हा विषय अत्यंत खुमासदार विनोदी शैलीत मांडून प्रेक्षकांना विचार करण्यास

निष्ठा आणि अभिनयातील प्रामाणिकपणा जपत, रंगभूमीशी पुन्हा घट्ट नाते जोडण्याचा कांचन पगारे यांचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. 'शिक्कामोर्तब' या नाटकात त्यांनी एका मजनू ह्या 'बंगाली' माणसाची अत्यंत अफलातून आणि आव्हानात्मक भूमिका लीलया साकारली आहे. बंगाली धाटणीच्या मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी आणि त्या भूमिकेची योग्य पकड घेण्यासाठी त्यांनी घेतलेली अपार मेहनत नाटकाच्या सादरीकरणात स्पष्टपणे दिसून येते. मजनू या पात्रात स्वतःला पूर्णपणे झोकून देऊन ते जिवंत करण्याची त्यांची शैली वाखाणण्याजोगी आहे. विनोदी प्रसंग असोत किंवा भावूक क्षण, त्यांच्या अभिनयातील नैसर्गिकपणा प्रेक्षकांना भारावून टाकतो. या नाटकात कांचन पगारे यांच्यासह सागर कारंडे, स्नेहा पराडकर आणि भक्ती रत्नपारखी या दिग्गज कलाकारांची दमदार फळी आहे. विशेषतः रंगमंचावर सागर कारंडे आणि कांचन पगारे यांची

भाग पाडण्यात दिग्दर्शक यशस्वी ठरले आहेत. कांचन पगारे आणि इतर कलाकारांच्या दमदार अभिनयाला तांत्रिक बाजूची उत्तम जोड मिळाली आहे. नेपथ्यकार संदेश बेंद्रे यांनी उभारलेले आलिशान घर, शीतल तळपदे यांची मोहवून टाकणारी प्रकाशयोजना आणि अभिजित पेंढारकर यांच्या सुमधुर संगीतामुळे नाटकाची रंगत अधिकच खुलते. नाटकाचे निर्मिती प्रमुख म्हणून महेंद्र खराडे उत्तम जबाबदारी सांभाळत आहेत. अभिनयाचा हा निखळ आनंद अनुभवण्यासाठी आणि कांचन पगारे यांच्या या नव्या व प्रेरणादायी नाट्यप्रवासाचे साक्षीदार होण्यासाठी रसिक नक्कीच आतुर असतील. या नवीन नाट्यकृतीसाठी कांचन पगारे आणि त्यांच्या संपूर्ण टीमला मनापासून शुभेच्छा. ही कलाकृती नक्कीच यशाची शिखरे गाठेल आणि रसिक प्रेक्षक आपल्या प्रेमाचा 'शिक्का' या नाटकावर नक्कीच उमटवतील, अशी नटेश्वर चरणी प्रार्थना!

# उल्हासनगरमध्ये भाजप मंडल २ तर्फे मोफत नेत्र तपासणी व चष्मा वाटप कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्हासनगर प्रतिनिधी/बाळासाहेब अहिरे

उल्हासनगर येथे भारतीय जनता पार्टी मंडल २ तर्फे आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १२ वर्षांच्या यशस्वी कार्यकाळानिमित्त देवा भाऊ यांच्या वतीने मोफत नेत्र तपासणी (डोळे तपासणी) व मोफत चष्मा वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या समाजोपयोगी उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमादरम्यान नागरिकांची डोळ्यांची तपासणी करून गरजूंना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी मंडल २ अध्यक्ष श्री रामप्रवेश यादव, महासचिव श्री हंसराज गुप्ता, श्री मधु पवार (झोपडपट्टी सेल अध्यक्ष), श्रीमती उर्मिला गुप्ता (जिल्हा महासचिव महिला मोर्चा), श्री आशीष यादव (उपाध्यक्ष), श्री दामोदर गायकवाड, श्री अनूप जायसवाल (वार्ड अध्यक्ष), श्री राजाराम यादव (सचिव), श्री रमेश बिंद (उपाध्यक्ष), श्री धर्मेंद्र यादव, श्री सुभाष दोंदे, श्री चंद्रिका निषाद, श्री रमेश गायकवाड तसेच अनेक प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.




# हिरेमठ फाऊंडेशनतर्फे 'द सोलापूर क्रिएटर्स अवॉर्ड २०२६' संपन्न; 'विवेक विस्तार' प्रकाशनाचेही दिमाखात उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सोलापूरच्या सांस्कृतिक आणि डिजिटल वैभवात भर घालणारा एक अभूतपूर्व सोहळा काल शहरात अत्यंत उत्साहात पार पडला. हिरेमठ फाऊंडेशनच्या वतीने 'द सोलापूर क्रिएटर्स अवॉर्ड २०२६' या विशेष पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यासोबतच फाऊंडेशनच्या 'विवेक विस्तार' या महत्त्वाकांक्षी प्रकाशनाचे औपचारिक उद्घाटनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सोलापूरमधील उदयोन्मुख डिजिटल प्रतिभावंतांना प्रोत्साहन देणे आणि शहराच्या समृद्ध वारशाचा विस्तार करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. हा भव्य सोहळा सोलापूरमधील हॉटगी रोड येथील 'द फर्न रेसिडेन्सी, सिरीज बाय मॅरियट' या ठिकाणी संपन्न झाला. या दिमाखदार सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून राज्यसभा खासदार डॉ. ज्योती वाघमारे उपस्थित होत्या. आपल्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनात डॉ. वाघमारे यांनी डिजिटल माध्यमांची



ताकद आणि भविष्यातील संधी यावर विशेष प्रकाश टाकला. सोलापूरला अधिक बलशाली आणि आधुनिक बनवण्यासाठी तंत्रज्ञानाचा योग्य वापर कसा करता येईल, याबद्दल त्यांनी उपस्थितांना बहुमूल्य ज्ञान दिले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते आणि हिरेमठ फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री. विवेकानंद हिरेमठ यांनी सोलापूरच्या समृद्ध संस्कृती आणि ऐतिहासिक वारशाचे पुनरुज्जीवन करण्यावर भर दिला. दिल्लीतील आपले अनुभव सांगताना त्यांनी, आपल्या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतून सोलापूरची सांस्कृतिक श्रीमंती पुन्हा एकदा जागतिक पातळीवर नेऊया, असा ठाम विश्वास व्यक्त केला. या सोहळ्यात सोलापूरचे नाव डिजिटल आणि निर्मिती क्षेत्रात उंचावणाऱ्या अग्रगण्य डिजिटल कलाकारांचा सन्मान करण्यात आला. 'द सोलापूर क्रिएटर्स अवॉर्ड' विजेत्यांमध्ये प्रामुख्याने खालील दिग्गजांचा समावेश होता: सुदक्षणा चाटला, अक्षता आहेरवाडी, नेहा राचर्ला, प्रज्ञा मागी, प्रज्ञा एकनाथ चौधरी, गजराज चौधरी, इम्पॅक्ट मोशन फिल्म्स, राहुल जाधवर, विठ्ठल पुजारी, अभिषेक भांगरे, चंदन पाच्छापुरे, पार्थ भोसले, कृष्णा मालवेकर, ऋषिकेश कोळी, गुरुदत्त जाधव, आकाश कोठडिया, रश्मी मोहोळकर, प्रविज्ञा. या सर्वांना त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पकतेसाठी या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने गौरविण्यात आले. याशिवाय, समाजावर सकारात्मक प्रभाव पाडणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना विशेष 'प्रभाव सन्मान' प्रदान करण्यात आला. यामध्ये गुरुदत्त जाधव, आकाश कोठडिया, रश्मी मोहोळकर आणि प्रविज्ञा यांचा समावेश होता. या संपूर्ण सोहळ्याचे नेटके नियोजन आणि शोभा वाढवण्यात हिरेमठ फाऊंडेशनचे मंडळ सदस्य श्री. अक्षय एस. जवळगीकर आणि विश्वतेज प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. अक्षय शेटे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. सोलापूरच्या तरुणाईला आणि कलाविश्वाला नवी दिशा देणारा हा सोहळा शहरात दीर्घकाळ लक्षात राहील, यात शंका नाही.

**वाळूच्या दोन हायवा टिपर, दोन टेम्पो एकूण चार वाहनावर कारवाई**

# पंढरपूर तालुका पोलिसांनी आंबे रांजणी रोडवर अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी

पंढरपूर तालुका पोलिसांनी जाणाऱ्या रोडवर अवैद्य वाळू वाहतूक केली जात आहे अशी माहिती मिळाल्याने पंढरपूर तालुका उपविभागीय पोलीस अधिकारी

**एकूण ५५ लाख ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त**

श्री प्रशांत डगळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध वाळू वरती कारवाई करण्याबाबत आदेश देण्यात आली होते व त्या अनुषंगाने पंढरपूर तालुका पोलिसांनी मौजे अंबे राजनी रोडवर आणि गोपाळपूर येथे रोडवर त्या ठिकाणी दोन हायवा व दोन टेम्पो असे एकूण चार वाहनांमध्ये ११ ब्रास अवैधरित्या वाळू असा एकूण ५५ लाख ६६ हजार रुपये चा मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त करून ताब्यात घेतले आहे दोन हायवा टेम्पो दोन टेम्पो असे चारही गाड्यांची चालक आणि मालक १) पप्पू शिंदे, २) रामा पुजारी३) दत्ता भोसले, यांच्या विरोधात पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे भारतीय न्याय संहिता बीएनएस कायदा कलम ३०३, ३०५, अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली माननीय अप्पर पोलीस अधीक्षक श्री विजय कबाडे साहेब माननीय सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत दगडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी वाय मुजावर पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले पोलीस उपनिरीक्षक विक्रम वडणे पोलीस उपनिरीक्षक रणदिवे साहेब



फौजदार जनार्दन करे पोलीस हवलदार दीपक भोसले मंगेश रोकडे पोलीस हवल साळुंखे विजयकुमार आवटी, संजय गुटाळ, चालक पोलीस कॉन्स्टेबल संतोष चव्हाण असंन नदाफ, गोडसे गोडसे, राजाभाऊ साठे यांच्या पथकाने केली.

# नागेश फाटे यांच्या साप्ताहिक 'लोक साहित्य'चे शरद पवार यांच्या हस्ते दिमाखात उद्घाटन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : महाराष्ट्राच्या वैचारिक आणि सांस्कृतिक परंपरेत भर घालणाऱ्या 'साप्ताहिक लोक साहित्य' या मराठी साप्ताहिकाचे उद्घाटन ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले. मुंबई येथे यशवंतराव चव्हाण सेंटर येथे हा कार्यक्रम झाला. या सोहळ्याला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील दिग्गजांची उपस्थिती लाभली होती.

या उद्घाटन प्रसंगी बोलताना मान्यवरांनी सांगितले की, सद्यस्थितीत सर्वसामान्य जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी आणि लोकसाहित्याचा वारसा जपण्यासाठी अशा साप्ताहिकांची नितांत गरज आहे.

याच प्रसंगी माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे खासदार सुप्रियाताई सुळे, माजी गृहमंत्री अनिल देशमुख,आमदार रोहितदादा पवार, आमदार जितेंद्र आव्हाड , माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे , खासदार डॉ. अमोल कोल्हे, खासदार धैर्यशीलभैय्या मोहिते-पाटील, खासदार भास्कर भकरे, खासदार बजरंग बाप्पा सोनवणे, आमदार बापूसाहेब पठारे,आमदार अभिजित पाटील,आमदार राजू खरे यांच्यासह अनेक मान्यवर, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. या साप्ताहिकाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील आवाज लोकांपर्यंत पोहोचेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.